**ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत शिक्षण सेवक भरतीकरीता “पवित्र” (PAVITRA- Portal For Visible to All Teachers Recruitment) ही संगणकीय प्रणाली ई-निविदा पध्दतीने विकसित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीईटी-२०१५/प्र.क्र.१४९/टीएनटी-१,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १२ मार्च , २०१८

**वाचा :-** शासन निर्णय क्र. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. सीईटी-२०१५/ प्र.क्र.१४९ / टीएनटी-१,दि.१२.६.२०१७.

**प्रस्तावना :-**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसह खाजगी शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित / अशंत: अनुदानित, अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळांमधील शिक्षक भरती अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे "पवित्र" या संगणकीय प्रणालीद्वारे करण्याबाबत कार्यपध्दती दि.२३.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली आहे.

सदर "पवित्र" ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय दि.१२.६.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या होत्या. आता सदर "पवित्र" ही संगणकीय प्रणाली N.I.C. मार्फत विकसित करण्याचा निर्णय दि.१.११.२०१७ च्या शासन आदेशान्वये घेण्यात आलेला आहे. यास्तव सदर दि.१२.६.२०१७ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत शिक्षण सेवक भरती करता "पवित्र" ही संगणकीय प्रणाली ई-निविदा पध्दतीने विकसित करण्याकरिता आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि.१२.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले होते. सदर शासन निर्णय या आदेशाद्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३१२१७५७०१०३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay
Dattatray Mane

Digitally signed by Sanjay Dattatray Mane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5938dfcf55dfa4d20c3c2b25ee54999d774aedb59d71b14cfc2860776279ef16, serialNumber=cc816238ed3c914e2fa2e99da4bc0ba4e1f6947aa23ad145e3dc6a469041090f, cn=Sanjay Dattatray Mane
Date: 2018.03.12 17:58:49 +05'30'

**( सं.द. माने )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १ / २.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १ / २.
६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.संग्रहार्थ (टिएनटी-१)